भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-०२/०४/२०१९

# प्रेसनोट

## <u>खुन करून चार महीन्यापासून पाहीजे असलेले आरोपी अटकेत</u>

भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दि.०२/०४/२०१९ रोजी तपास पथकाचे पो.उप-निरीक्षक श्री.महेंद्र पाटील हे त्यांचे स्टाफसह पोलीस ठाणे हददीत घडणारे गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन पेट्रोलींग करीत असताना पेट्रोलींग करीत करीत त्रिमुर्ती चौक येथे आले असता **पोलीस कर्मचारी विनोद भंडलकर व उज्वल मोकाशी** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, चौघेजण इसम १)शुभम हंगरगे २)बाळा रेणुसे ३)प्रकाश मरगळे ४)अतुल बोकन हे आंबेगाव पठार चिंतामणी ज्ञानपिठजवळ हायवे कडे जाणा-या कच्या रोडने जाणार आहेत. त्यांने त्याचे साथीदारासह सुमारे ४ महीन्यापुर्वी आंबेगाव पठार येथे एका इसमाचा खुन केलेला आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याचे आम्हांस कळविलेनंतर लागलीच आम्ही सदरची बातमी वरिष्ठांना कळविली असता त्यांनी खात्री करुन योग्य ती कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केलेनंतर लागलीच आम्ही कात्रज चौक येथुन वरील स्टाफ असे खाजगी वाहनाने रवाना होवून चिंतामणी ज्ञानपिठजवळ हायवे कडे जाणा-या कच्या रोडवर आडबाजुस जावुन वॉच केला असता बातमीतील वर्णनाचे इसम संशयीत रित्या वावरत असताना दिसलेने त्यांस आम्ही हटकले असता ते पळुन जाणेचा प्रयत्न करु लागल्याने त्यांस स्टाफचे मदतीने ०७/३० वा पकडुन त्यांस आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांस त्याचा नाव पत्ता विचारता त्यांने त्याचा नाव पत्ता १) प्रकाश लक्ष्मण मरगळे वय-२१ धंदा-भाजी विक्री रा.चव्हाणनगर धनकवडी २)शुभम रमेश हंगरगे वय-२० धंदा-मोबाईल दुकान रा.शंकर सहकारी सोसायटी भारती विद्यापिठ पुणे ३)अतुल अनिल बोकन वय-२५ रा.गणेश दर्शन अपार्टमेंट आंबेगाव पठार पुणे ४)रोहीत रामभाउ रेणुसे वय-२० रा.मातृछाया अपार्टमेट जांभुळवाडी पुणे असे असल्याचे सांगितले. नंतर त्यांना पोलीस ठाणे येथे आणून विश्वासात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता तपासादरम्यान त्यांचा दाखल गुन्हयामध्ये सहभाग असल्याने गुन्हा घडलेपासुन फरारी असल्याचे सांगितले.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.व्ही.पी.नांदेडकर सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. महेंद्र पाटील, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवालदार सिध्देश्वर पळसे,विनोद भंडलकर,गणेश सुतार,प्रणव सकपाळ,उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड,जगदीश खेडेकर यांचे पथकाने केलेली आहे.**

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे**